महासागर अमरावती

मंगळवार, दि. 2 ऑक्टोंबर 2024

पान 3

# अल्पवयीन मुलीच्या अपहरणकर्त्याला नागपुरातून अटक

## अल्पवयीनसह आरोपींना घेऊन रात्री उशिरा पोहोचतील शहरात

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 1 ) -** बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अंजनगावबारी येथे राहणार्या 16 वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण करणार्या आरोपीला पोलिसांनी नागपुरातून अटक करण्यात आली आहे. मंगळवारी रात्री उशिरापर्यंत अल्पवयीनसह आरोपींना अमरावती येथे आणण्यात येणार आहे. अल्पवयीन मुलगी सापडल्यानंतर कुटुंबीयांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

गेल्या आठ दिवसांपूर्वी बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अंजनगाव बारी येथे राहणार्या 16 वर्षीय अल्पवयीन मुलीला एका विशिष्ट समाजातील तरुणाने फूस लावून पळवून नेले होते. याबाबत कुटुंबीयांनी बडनेरा पोलिस ठाण्यात तक्रार केली होती. मात्र चार दिवस उलटून गेल्यानंतरही त्याचा शोध न लागल्याने त्याच्या कुटुंबीयांनी व ग्रामस्थांनी बडनेरा पोलिस स्टेशनचा दरवाजा ठोठावला. त्यानंतर तीन ते चार दिवस अल्पवयीन आरोपींना अटक न झाल्याने कुटुंबीय व ग्रामस्थांनी आमदार रवी राणा यांना माहिती दिली. त्यानंतर आमदार रवी राणा यांनी गावकर्यांसोबत जाऊन पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांच्याकडे तक्रार केली आणि आरोपीसह त्याला पळून जाण्यास मदत करणार्या व्यक्तीला अटक करण्याची मागणी केली.

### तीन पथके घेत होते शोध

या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस प्रशासनाने अल्पवयीन व आरोपीच्या शोधासाठी तीन पथके तयार केली होती. त्यांना वेगवेगळ्या दिशेने शोध घेण्याचे आदेश देण्यात आले होते. मंगळवारी सायंकाळी 5 वाजता एका पथकाने सदर अल्पवयीन व आरोपींना नागपुरात पाहिले. तत्काळ अल्पवयीन मुलीला सुखरूप ताब्यात घेण्यात आले आणि आरोपी तरुणाला अटक करण्यात आली. मंगळवारी रात्री उशिरा अल्पवयीन व आरोपी तरुणाला अमरावती येथे आणणार असल्याची माहिती मिळाली आहे.

# शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अरबट यांच्या वाहनावर फायरिंग

■ थोडक्यात बचावले; राजकीय वर्तुळात खळबळ

■ स्वपक्षातूनच वॉर, पोलिसांनी सुरु केला फॉरेन्सिक तपास



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 1 ) -** शिवसेनेच्या शिंदे गटाचे अमरावती जिल्हा प्रमुख गोपाल अरबट यांच्या कारवर अज्ञात आरोपींनी सोमवारी मध्यरात्री गोळीबार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेत आरोपींनी अरबट यांच्या कार वर 3 राउंड फायर केले. वलगाव ते दर्यापूर मार्गावर ही घटना घडली आहे. सुदैवाने या घटनेत गोपाल अरबट यांना कोणतीही दुखापत झाली नाही. या घटनेने अमरावती जिल्ह्यात राजकीय खळबळ उडाली आहे.

या पूर्वीही सायंकाळी अमरावती शहरात त्यांच्यावर दोघांनी हल्ला केला होता. ते प्रकरण कोतवाली पोलिस ठाण्याच्या आवारातच मिटविण्यात आले होते. त्यानंतर रात्री त्यांच्या वाहनावर गोळीबार झाला. अरबट यांनी या घटनेमागे शिवसेनेच्या शिंदे गटाचेच दुसरे जिल्हाप्रमुख अरुण पडोळे हे असल्याचा दावा पोलिसांना दिलेल्या तक्रारीत केला आहे. तर पडोळे यांनी मात्र या घटनेत त्यांचा हात नसल्याचे सांगून हात वर केले आहे. मागील काही दिवसांपासून अरुण पडोळे आणि गोपाल अरबट यांच्यात राजकीय वाद सुरू आहे. हा वाद दिवसेंदिवस टोकाला जात आहे. काही महिन्यांपूर्वी अरबट यांच्यावर दर्यापूर येथे हल्ला झाला होता. तेव्हा पण त्यांनी पडोळे यांच्यावरच संशय व्यक्त केला होता. पोलिसांनी या प्रकरणी फॉरेन्सिक तपास सुरु केला आहे. या प्रकरणात अद्याप कुणाला अटक झालेली नाही. अमरावती जिल्ह्यातील शिंदे शिवसेनेचे दुसरे जिल्हाप्रमुख अरुण पडोळे यांच्या सांगण्यावरून माझ्या गाडीवर हल्ला झाला, असा आरोप गोपाल अरबट यांनी वलगांव पोलिसांना दिलेल्या तक्रारीत केला आहे.

### कारवर एकापाठोपाठ एक तीन गोळ्या फायर

दर्यापूर निवासी अरबट हे सोमवारी रात्री वलगाव ते दर्यापूर मार्गावरुन कारने प्रवास करीत होते. यावेळी त्यांच्या इनोव्हा कारवर अज्ञात व्यक्तीने गोळीबार केला. आरोपींनी अरबट यांच्या कारवर एकापाठोपाठ एक तीन गोळ्या फायर केल्या. सुदैवाने या घटनेत अरबट यांना कोणतीही दुखापत झाली नाही. गोळीबारात गाडीच्या काचा तेवढ्या फुटल्या. दरम्यान आरडाओरड होताच आरोपी घटनास्थळावरून फरार झाले. त्यानंतर अरबट यांनी तातडीने वलगाव पोलिस ठाण्यात धाव घेत झालेल्या गोळीबारा संदर्भात माहिती दिली. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून घटनेचा तपास सुरु केला आहे.

# 15 हजारांची लाच घेताना तलाठ्याला पकडले

## सातबारा वेगळे करण्यासाठी पैशांची मागणी



**एसीबीची कारवाई**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 1 ) -** सातबारा वेगळे करण्यासाठी 15 हजार रुपयांची लाच मागणार्या पटवारीला लाच लुचपत प्रतिबंधक पथकाने रंगेहाथ अटक केली आहे. वरुड तहसीलच्या पुसला येथील पटवारी कार्यालयात 1 ऑक्टोबर रोजी हा सापळा रचून कारवाई करण्यात आली. लाच घेणारा पटवारी राजेश रामदास लोंदे (51) आणि लाच देण्यासाठी प्रोत्साहन देणारा अस्लम शाह गुलामरसू शहा (66) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पटवारी आरोपी राजेश रामदास लोंदे याने वरुड तहसीलच्या पुसला येथील रहिवासी असलेल्या 53 वर्षीय तक्रारदारास सामाईक शेती विभाजन पत्रानुसार परवानगी मिळण्याच्या अर्जावर तहसीलदारांच्या स्वाक्षरी आणि अहवाल सादर करण्यासाठी 40 हजार रुपयांची लाच मागितली होती.

यासंदर्भातील तक्रार एसीबीकडे प्राप्त झाली. त्यानुसार, 13 सप्टेंबर रोजी सापळा रचून सरकारी साक्षीदारांसह चौकशी करण्यात आली.

त्यानंतर आरोपी राजेश लोंडे याने तडजोड करून 15 हजार रुपयांची मागणी केली. आरोपी अस्लम शहा गुलामरसू शहा याने त्याला लाच घेण्यासाठी प्रोत्साहन दिले. 1 ऑक्टोबर रोजी एसीबीच्या पथकाने वरुडच्या पटवारी कार्यालयात सापळा रचला. येथे पटवारी राजेश लोंडे व अस्लम शहा यांना तक्रारदाराकडून 15 हजारांची लाच घेताना रंगेहात पकडण्यात आले. पटवारी व इतर आरोपींवर शेंदूरजनाघाट पोलीस ठाण्यात लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यान्वये कारवाई करण्यात आली आहे.

## अपघातात जखमीचा मृत्यू



**अमरावती -** तळेगाव दशासर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मालतपूर फेटेजवळ एमएच 27/डीएक्स 6801 क्रमांकाच्या पिकअप वाहनाच्या चालकाने बेदरकारपणे वाहन चालवून रमेश लहानुजी गजभिये यांच्या मोटारसायकलला दुचाकीला धडक दिली. त्यात ते गंभीर जखमी झाले. त्यांना उपचारासाठी यवतमाळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. रवींद्र रमेशराव गजभिये यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी चालक नयन हरिदास वानखडे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## हुंड्यासाठी विवाहितेचा छळ



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 1 )-** चांदूर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणार्या या तरुणीचा विवाह यवतमाळच्या बाभूळगाव तालुक्यातील आसेगाव येथील रवींद्र बबनराव आंबिलकर यांच्याशी झाला आहे. लग्नानंतर सासरच्यांनी मुलगा होऊ नये म्हणून आणि हुंड्यासाठी तिचा मानसिक व शारीरिक छळ सुरू केला. विवाहितेच्या तक्रारीवरून चांदूरबाजार पोलीसांनी पती रवींद्र आंबिलकर व इतर सदस्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## भांडीच्या गोदामातून 12 हजारांचा मुद्देमाल लंपास

**अमरावती -** दत्तपूर पोलीस ठाणे हद्दीतील शनिमंदिर चौकात असलेल्या भांडीच्या गोदामातून अज्ञात आरोपीने सेगडी व इतर साहित्य चोरून नेले. चोरीला गेलेल्या मालाची किंमत 12 हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. भरत गोपाल लोया यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# नवरात्रोत्सवा दरम्यान राहणार कडेकोट पोलीस बंदोबस्त

■ 1600 हून अधिक अधिकारी व जवान होणार तैनात

■ 12 सीआर व्हॅन, 6 दामिनी पथक शहरात गस्त घालणार आहेत



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.1 ) -** नवरात्रोत्सव गुरुवार 3 ऑक्टोबरपासून सुरू होत आहे. यावेळी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस आयुक्तालयाकडून विशेष पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. यामध्ये 23 पोलिस उपायुक्त, 5 सहायक पोलिस आयुक्त, 25 पोलिस निरीक्षक, 70 सहायक पोलिस निरीक्षक आणि पोलिस उपनिरीक्षक, आरसीपी आणि क्यूआरटी पथकांसह 1350 पोलिस अधिकारी, राज्य राखीव पोलिस दलाची एक कंपनी आणि 500 स्त्री-पुरुषांचा होमगार्ड यांचा समावेश आहे. पोलीस ठाणे निहाय शहरातील महत्त्वाचे चौक, गर्दीची ठिकाणे आणि संवेदनशील वसाहतींमध्ये फिक्स पॉइंट बसविण्यात येणार आहेत.

सीआर आणि दामिनी पाठक गस्त घालणार आहेत. शहरात नवरात्रोत्सवानिमित्त पोलिस विभागाकडून फिक्स पॉइंट ठेवण्यात येणार आहेत. याशिवाय 12 सीआर मोबाईल व्हॅन, 6 दामिनी पाठक, बीट मार्शल आणि डायल 112 वाहने नागरिकांच्या सुरक्षेसाठी गस्त घालत राहणार आहेत. त्यामुळे गुन्हेगारांमध्ये दहशत निर्माण होणार आहे. सर्व सरकारी विभागांना माहिती नवरात्रोत्सव शांततेत व सुरक्षित व्हावा. यासाठी पोलीस विभागामार्फत सर्व शासकीय विभागांना त्यांचे अधिनस्त काम पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. याबाबत त्यांना पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

तसेच पोलीस आयुक्तालयातील सर्व संबंधित वरिष्ठ अधिकार्यांना सर्व प्रकारची खबरदारी घेण्याच्या सूचना दिल्या. नागरिकांनी हा सण शांततेत आणि आनंदात साजरा करण्याचे आवाहन पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी केले आहे. नवरात्रोत्सव कालावधीत सर्व दुर्गादेवी व शारदादेवी मंडळांना उत्सव उत्साहात साजरा करण्यासाठी पोलीस आयुक्तांनी मार्गदर्शन करीत माहिती दिली की, सायबर पोलिस ठाण्याचे विशेष पथक सोशल मीडियावर लक्ष ठेवणार आहे. मिरवणूक मार्गावर सीसीटीव्ही आणि व्हिडिओग्राफरच्या माध्यमातून लक्ष ठेवण्यात येणार आहे. मिरवणुकीत ज्वलनशील पदार्थ, हत्यारे, काठ्या, आक्षेपार्ह गाणी वाजवणे, आक्षेपार्ह दृश्य सादर करणे आदींवर बंदी घालण्यात आली आहे. गैरप्रकार करणार्यांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. नवरात्रोत्सवाच्या घटस्थापना व विसर्जन मिरवणुकीत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस आयुक्तालयाच्या वतीने समाजकंटकांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याच्या सूचना पोलीस आयुक्त रेड्डी यांनी सर्व पोलीस ठाण्याचे प्रभारी व वरिष्ठ अधिकार्यांना दिल्या आहेत.

### मंगळवारी झाली आयुक्तालयात बैठक

मंगळवार, 1 ऑक्टोबर रोजी पोलीस आयुक्तालयात बैठक झाली. बैठकीत पोलीस आयुक्त, महानगरपालिका आयुक्त, अग्निशमन विभाग, कार्यकारी अभियंता महावितरण विभाग, निवासी वैद्यकीय अधिकारी, प्रादेशिक परिवहन विभागाचे अधिकारी, बाजार परवाना विभागाचे अधीक्षक, अन्न व औषध प्रशासन विभाग यांच्यासह अंबादेवी व एकवीरा देवी संस्थानचे अध्यक्ष आणि अधिकारी उपस्थित होते. दुर्गा शारदा व गरबा नृत्य मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीत झाडांच्या फांद्या, विद्युत तारा, केबल वायर, पथदिवे दुरुस्तीची माहिती देण्यात आली. नवरात्रोत्सवादरम्यान दुर्गादेवी, शारदादेवी आणि गरबा कार्यक्रमाच्या आयोजकांना मार्गावर मंडप न टाकणे, पायर्यांचा आकार मर्यादित ठेवणे, मूर्ती व मंडपांच्या सुरक्षेसाठी मंडळ स्वयंसेवक घोषित करणे, परिसरात सीसीटीव्ही बसवणे, आदी सूचना करण्यात आल्या.

# महिला मेळाव्यासाठी समन्वयाने कार्य पार करावे

## लाडकी बहिण योजनेचा सोमवारी जिल्हास्तरीय कार्यक्रम



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 1 ) -** मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचा जिल्हास्तरीय कार्यक्रम 7 ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात येणार आहे. यासाठी जिल्हाभरातील महिलांचा सहभाग राहणार आहे. या मेळाव्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने कार्य करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिले.

**जिल्हाधिकारी सौरभ कटियार**

जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत बैठक घेण्यात आली. यावेळी पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, महिला व बाल विकास अधिकारी डॉ. उमेश टेकाळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कैलास घोडके आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कटियार यांनी कार्यक्रम आयोजनाचा आढावा घेतला. कार्यक्रमाच्या ठिकाणी बैठक क्षमतेएवढ्याच लाभार्थी महिला बोलावण्यात याव्यात. संपूर्ण जिल्ह्याचे प्रतिनिधीत्व या कार्यक्रमात यावे, यासाठी प्रत्येक तालुकास्तरावरून एक बस येईल, असे नियोजन करण्यात यावे. लाभार्थी आणण्याची जबाबदारी सोपविलेल्या यंत्रणांनी लाभार्थी निवडताना युवा लाभार्थी प्रामुख्याने निवडावेत.

जवळच्या भागातील जास्त लाभार्थी आणण्यावर भर देण्यात यावा. प्रवासादरम्यान त्यांना कोणताही त्रास होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. कार्यक्रमात महिला आर्थिक सारक्षता, सुरक्षा आणि रोजगाराविषयी मार्गदर्शन करण्यात यावे. कार्यक्रमाचे आयोजन सायंसस्कोर मैदानावर होणार आहे. याठिकाणी सुरक्षेची व्यवस्था करण्यात यावी. प्रामुख्याने महिला पोलिसांची नियुक्ती करण्यात यावी. तसेच कार्यक्रमाच्या ठिकाणी पुरेशा फिरत्या शौचालयाची व्यवस्था करण्यात यावी. याठिकाणी मुबलक पाणी पुरवठा होईल, याची दक्षता घ्यावी. कार्यक्रम अधिक वेळ सुरू राहणार असल्याने लाभार्थ्यांच्या नास्ता आणि जेवणाची व्यवस्था करण्यात यावी. कार्यक्रमाच्या ? ठिकाणी आरोग्य पथक तैनात करण्यात यावे. याठिकाणी लाभार्थी मोठ्या प्रमाणावर येणार असल्याने शासकीय योजनांचे स्टॉल लावण्यात यावेत.



## ग्रामपंचायतीची पाण्याची मोटार लंपास

**अमरावती -** तिवसा पोलीस ठाणे हद्दीतील भांबोरा येथील वन बंदी फार्म संकुलात ठेवलेली शेंदुरजना बाजार ग्रामपंचायतीला पाणीपुरवठा करणारी सदोष मोटार अज्ञात व्यक्तीने चोरून नेली. चोरीला गेलेल्या मशीनची किंमत 25 हजार रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. महिलेच्या तक्रारीवरून तिवस पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## मुख्य तंत्रज्ञांना शिवीगाळ करून धमकी दिली

**अमरावती-** शिरखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील निंभी येथील वीज वितरण केंद्रात कार्यरत मुख्य तंत्रज्ञ नरेंद्र महादेवराव शहाळे यांना आरोपी विशाल बरबडे याने लाईन का बंद केली म्हणून शिवीगाळ करून मारहाण केली. नरेंद्र शहाळे यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी विशाल बारबडे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा पुढिल तपास शिरखेड पोलीस ठाण्याचे ठाणेदाराच्या मार्गदर्शनात पोलीस करीत आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# मेळघाटातील शेतकरी रानडुकरांना हैराण

## वन विभागामार्फत पीक नुकसानाचा मोबदला मिळण्याची मागणी

**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी, (दि.1)–** मेळघाटातील शेतकरी रानडुकरांना हैराण झाला आहे. पीकाचे मोठ्याप्रमाणात नुकसान होत असतानाही मोबदला मिळत नसल्याने शेतकरी हवालदील झाला आहे.

आज देशभर वन्यजीव सप्ताह हा शहरी वन्यजीव प्रेमी, वन विभाग मोठ्या उत्साहाने साजरा करत आहेत. त्या करीता आपल्या देशात 1972 चा वन्यजीव संरक्षण कायदा लागू झाला. वनांमधील सर्व प्राण्यांना सरसकट संरक्षण मिळाले. त्यामुळे नुकसानकारक शाकाहारी जनावरे मोठ्या प्रमाणात वाढली आहेत. आज सर्व मेळघाटातील



शेतकरी शाकाहारी वन्यजीवांच्या पिक नुकसानीने हतबल झाले आहेत. पिकांच्या वाचविण्यासाठी शेतात रात्रभर मुक्काम करून जागरण करावे लागत आहे. दरवर्षी प्राणी गणना होते, प्रामुख्याने व्याघ्र गणना केली जाते. आज रानडुकरांची संख्या जंगलाच्या वहन क्षमतेनुसार वन विभागाकडे नोंद नाही. रान डुकराची मादी ही वर्षभरातून दोनदा प्रजनन करते. सरासरी एक मादी 10–15 पिल्ले जन्माला घालते, आणि त्यांचा मृत्युदर अत्यंत कमी आहे. त्यामुळे देशातील वनांमध्ये मोठ्या प्रमाणात रानडुकरे वाढली आहेत. आज सागवान च्या जंगलात रायमुनिया, कुकुरकोंडा, रान तुळस अश्या वनस्पतींचे प्रमाण अगणित वाढल्याने जंगलात शाखाहारी प्राण्यांना त्यांचे अनुरूप खाद्य वनस्पती, गवत राहिले नाही. मेळघाटातील शेतकरी पीकवाचवण्यासाठी साड्यांचे कंपाउंड करतो, कोणी झटका मशीन लावतो पण तरीही पिके वाचवता येणे कठीण झाले आहे. नुकसान भरपाईसाठी ग्रामसेवक, कृषिसेवक, वनरक्षक हे तीन कर्मचारी लोकांनी एकत्र येऊन पंचनामा करणे गरजेचे आहे. मात्र तसे होत नाही. आज ऑनलाईन च्या नावावर पंचनामा करणे नुकसान भरपाईचा फॉर्म भरणे ही कामे शेतकऱ्यांला करावी लागत आहेत. नुकसानभरपाई मिळवणे अवघड आहे. कारण अशिक्षित शेतकरी हे ऑनलाईन फॉर्म भरणे करू शकत नाही. आज हा सगळा विचार करून वन्यजीव सप्ताह मध्ये वन्यजीव व्यवस्थापनाचा, अधिवास व्यवस्थापनाचा स्वीडन, नॉर्वे, केनिया सारख्या देशांचा प्रगत विचार रुजवणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची गरज आहे, वन विभागामार्फत अशा शेतकऱ्यांना नुकसान भरपाई तत्काळ देण्यात यावी अशी मागणी होत आहे.

सध्या आमच्या शेतामध्ये मक्का ज्वारी अशी खरीप पिके आम्ही आमच्या शेतामध्ये लावतो परंतु रानडुकरांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. जंगलातील डुकर तसेच इतर वन्य प्राणी रात्रीच्या वेळेस शेतामध्ये शिरतात व मोठ्या प्रमाणात नुकसान करतात. वन्यजीवांना रोकण्यासाठी अनुदानित झटका मशीन 100 टक्के पैसे आधी भरून आता मिळत आहे. त्यामुळे आम्हाला घेणे शक्य होत नाही. झटका मशीन साठी आम्हाला सहकार्य करावे.
**कुलदीप संतु कासदेकर, माखला.**

# एक्सेस बँक मायक्रो फायनान्सच्या कर्मचाऱ्यांच्याकडून गंडा

### 34 महिलेच्या बँकेतून 45 हजारांची रक्कम काढली



**महासागर प्रतिनिधी**
**चिखलदरा, (दि.1)–** मायक्रो फायनान्स देण्याच्या नावावर 34 महिलांच्या बँकेतून 45 हजाराची रक्कमेची उचल केली. याप्रकरणी चिखलदरा पोलिसात तक्रार दिली आहे.

दिलीप मालवे, स्वराज्य मेश्राम, ऋषिकेश असे परतवाडा येथील या एक्सेस बँक मायक्रो फायनान्सच्या कर्मचाऱ्यांचे नावे आहेत.

तक्रारकर्ता महिलांनी चिखलदरा पोलिसात आपली तक्रार नोंदविली की, मायक्रो फायनान्स च्या परतवाडा येथील कर्मचारी यांनी लवादा, आलाडोह, खटकाली, आमझरी या गावातील 34 महिलांना बचत गट काढण्यास सांगीतले व त्यांनी प्रत्येक महिलांना 5 हजार रुपये प्रमाणे लोन मिळेल व त्यांना ते लोन व्यवसाय करण्याकरीता फ्रि मध्ये मिळेल असे सांगून त्यांचे सिम कार्ड व एअरटेल चे अकाऊंट उघडून ते सिम त्यांना न देता त्यांनी त्यांच्या जवळच ठेवले, त्यांना विचारले असता हे सिम तुमच्या जवळ का ठेवले. तर त्यांनी असे सांगितले की, जो पर्यंत लोन ची प्रोसेस होत नाही, तो पर्यंत हे सिम बँक मध्ये राहील असे सांगून दिलीप मालवे यांनी ते सिम महिलांकडून घेतले. त्यानंतर चार दिवसांनी कैलाश किशोर चव्हाण व अशोक पाटील या दोघांनी तुम्हाला सिम कार्ड मिळाले का असे विचारले. महिलांनी त्यांना सांगितले की, आम्हाला सिमकार्ड मिळालेच नाही. फक्त प्रत्येक महिलांना 5 हजार रुपये आणुन दिली. त्यानंतर बँकेतून पैसे काढल्याचा प्रकार समोर आली. याप्रकरणी चिखलदरा पोलिसात तक्रार नोंदविली आहे.

# कुशल चौधरी यांच्या सत्कार

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि.1)–** अंजनगाव सुर्जी येथील दैनिक महासागर चे प्रतिनिधी कुशल चौधरी यांचा दैनिक महासागरचे मुख्य संपादक श्रीकृष्ण चांडक (नागपूर) यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला.



अंजनगाव सुर्जी येथील दैनिक महासागरचे प्रतिनिधी कुशल चौधरी यांच्यावर तत्कालीन ठाणेदार सुधीर पाटील यांनी फार मोठा अन्याय केला होता. झालेल्या अन्यायाबद्दल कुशल चौधरी यांनी पोलीस विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत त्याबाबत तक्रारी केल्या होत्या. परंतु वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तत्कालीन ठाणेदार सुधीर पाटील यांच्यावर योग्य ती कार्यवाही केली नसल्याने कुशल चौधरी यांनी राज्य मानव अधिकार आयोगाकडे तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीची गंभीर दखल राज्य मानवाधिकार आयोगाने घेतली होती. राज्य मानव अधिकार आयोगाकडे तत्कालीन ठाणेदार सुधीर पाटील यांच्याविरुद्ध प्रकरण सुरू होते.

सदर प्रकरणात तत्कालीन ठाणेदार सुधीर पाटील यांना आठ लाख रुपये दंड व लाच लुचपत प्रतिबंधक कार्यालया अकोल्याच्या वतीने दाखल करण्यात आलेल्या पुण्यामध्ये सह आरोपी करण्याचे आदेश राज्य मानव अधिकार आयोगाकडून करण्यात आला होता. आपल्यावर झालेल्या अन्याय बद्दल न्याय मागण्यासाठी कुशल चौधरी यांनी तब्बल सहा वर्ष केलेला पाठपुरावा तसेच त्यांच्या धाडसा बद्दल आज अमरावती येथील एका बैठकीमध्ये 'दैनिक महासागर' चे मुख्य संपादक श्रीकृष्ण चांडक यांनी कुशल चौधरी यांचे कौतुक करून यांच्या हस्ते कुशल चौधरी यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी उमाशंकर लाल यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

# मानव्य शास्त्र अभ्यास मंडळाचे गठण

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी, (दि.1)–** स्थानिक श्रीमती राधाबाई सारडा कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात मानव्य शास्त्र अभ्यास मंडळाचे गठन करण्यात आले. यावेळी अभ्यास मंडळात अध्यक्ष म्हणून अजय इंगळे, बी ए भाग 3, उपाध्यक्ष म्हणून क्षितिजा जैन, बीए भाग 2, सचिव म्हणून संस्कृती करमसिद्धे, बीए भाग 2, सहसचिव पायल इंगळे, बीए भाग 1, कोषाध्यक्ष म्हणून नंदिनी प्रजापती बीए भाग 2, प्रसिद्धी प्रमुख म्हणून वेदिका नवले बीए भाग 1, सदस्य म्हणून वैष्णवी धर्मे बीए भाग 1, दिव्या गोंडाणे बीए भाग 1, अभिषेक धर्मे बीए भाग 1, हर्षदा पाटील, बीए भाग 2, गौरी सोनटक्के बीए भाग 2 यांची निवड करण्यात आली. मानव्य शास्त्र अभ्यास मंडळाद्वारे वर्षभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. यावेळी प्रा.डॉ कविता मालोकार, डॉ.नितीन सराफ, प्रा. सुरेंद्र किन्हीकर उपस्थित होते. याकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य बशिष्ट चौबे यांचे मार्गदर्शन लाभले.





# आ.रवी राणांनी केलेले भूमिपूजन म्हणजे लबाडाचे आमंत्रण

### भाजप नेते तुषार भारतीय



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती( दि.1 ) –** बडनेरा मतदार संघात आता आमदार कडून भूमिपूजनाचा हैदोस सुरु आहे. 3000 फलक लावणे तेवढेच नारळ फोडणे ,10 चुना पोते चुना आणि फटाके काही कार्यकर्ते गाडीत घेऊन फिरणे एका गाडीत ताशे वाजवणारे अशी वरात सध्या मतदार संघात फिरत आहे. हा हैदोस दर पाच वर्षांनी होत असल्याने टिंगल टवाळीचा विषय बनला असून मागील दहावर्षा पूर्वीचे काम झाली नसल्याने गेले 5 वर्ष झोपले होते का? असा प्रश्न जनता विचारत आहे. जुन्या भूमिपूजनाच्या कामाचे काय झाले? ते कामे झाली नाही तसे आता होत असलेले भूमीपूजन म्हणजे लबाडाचे आमंत्रण आहे. ते काम होणारच नाही असे प्रतिपादन भाजपा नेते तुषार भारतीय यांनी कमल प्लाझा ते मंगल धाम कॉलनी या रस्त्याचे 100 लाख रुपयाच्या काँक्रीटीकरण भूमीपूजन कार्यक्रमात बोलत होते.

या रस्त्यासाठी उपलब्ध निधीची व्यवस्था तुषार भारतीय यांनी केल्यावरही आमदार रवी राणा यांनी भूमीपूजन केल्याने हा वाद पेटला आहे. या अगोदर अनेक कामावर स्वत:चे फलक लावून श्रेय घेण्याचा प्रकारामुळे भाजपा कार्यकर्ते आता अधिक आक्रमक झाले आहे. मी केलेल्या कामाचे भूमीपूजना चे काम आचार संहितेच्या अगोदर सुरु होईल. या कामात आमदाराने लुडबुड करू नये. असा खणखणीत इशारा दिला.या मतदार संघातील मतदार आता कंटाळला असून आता बदल पाहीजे आहे. शाश्वत विकास पाहिजे आहे. तो करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहो असा विश्वास तुषार भारतीय यांनी दिला.

या वेळी माजी उपमहापौर संध्या टिकले, वंदना हरणे, चंद्रकांत खानझोडे, दादाराव काळे, प्रदीप ठाकरे, रश्मी पाटील, मंदा कुळकर्णी, मनीष पाटील, नलिनी कोराएट उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन कुणाल टिकले यांनी केले.

# प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वामुळे महिला उच्चपदावर

### प्रविण पोटे यांनी केले वूमन पावर प्रदर्शनी चे उद्घाटन



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.1 )–** भाजपा अमरावती शहर अध्यक्ष मा. आ. प्रविण पोटे पाटील यांनी रंगोली मंगल कार्यालय येथे आयोजित महिलांच्या कलेला प्रोत्साहन देणाऱ्या वूमन पावर एक्स्पो (ङ्खश्वद्वद्गठ्ठ'ह्य क्कश्2द्गह्ल श्व×श्चश्) चे उदघाटन केले.

आज महिला सगळ्या कार्य क्षेत्रात त्यांच्या कर्तृत्वामुळे व मेहनतीमुळे उच्च पदावर आहेत त्या करत असलेल्या कार्यात त्यांना थोडी प्रेरणा दिली की त्यात त्यांना लवकर यश प्राप्त करता येते, जिद्द चिकाटीने काम केल्याने यश मिळवत जगामध्ये महिलांनी त्यांची एक ओळख निर्माण केली आहे. समाजातील प्रत्येक महिलेने स्वत:चे महत्त्व व कला कौशल्य ओळखत उदरनिर्वाह करिता बचत गटामार्फत नावीन्यपूर्ण उद्योग सुरू करावे त्यामुळे त्याची प्रगती होईल असे प्रतिपादन यावेळी भाजपा अमरावती शहर अध्यक्ष मा. आ. प्रविण पोटे यांनी केले तसेच सर्व महिलांसोबत त्यांना प्रोत्साहन देत संवाद साधला यावेळी आयोजक पूनम गोमाशे, सुरेखा लुंगारे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.



# माळी समाज ऋणानुबंध पासून सर्व जाती-जमातींनी प्रेरणा घेतली

### मोर्शी येथे पदाधिकारी व संघटकांची बैठक

**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.1 )–** सर्व शाखीय माळी समाज उपवर युवक युवती ऋणानुबंध परिचय महासंमेलनाचे पदाधिकारी व स्थानिक संघटकांची बैठक मडघे सभागृहात पार पडली. प्रारंभी महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करण्यात आले.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुरेशराव टवलारे यांचे अध्यक्षतेत झालेल्या या सभेचे उद्घाटक महासंमेलनाचे संस्थापक प्रा. श्रीकृष्ण बनसोड होते. त्यांनी सकल माळी समाज ऋणानुबंध पासून सर्वच जाती धर्मातील सर्व जाती-जमातींनी प्रेरणा घेऊन परिचय मेळावे सुरू केल्याचे सांगून 29 वे बहुराज्यस्तरीय विवाह इच्छुकांचे परिचय महासंमेलनाचे 5 जानेवारीला अमरावतीच्या ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे आयोजन केल्याचे सांगितले. मोर्शी तालुका संघटक तथा पत्रकार अंबादास सिनकर यांनी प्रास्ताविक व स्वागत पर भाषण केले. याप्रसंगी हिवरखेड चे प्राचार्य रवींद्र वासनकर, रवींद्र साबळे, पत्रकार अजय पाटील, शंकरराव फरकाडे, वसंतराव भडके, सुरेशराव केंडे, मधुकरराव आखरे, डॉ. रवींद्र कुबडे आदींनी समायोजित विचार व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणातून सुरेशराव टवलारे यांनी ऋणानुबंध परिचय पुस्तकातून माळी समाजाच्या प्रत्येक उपवर युवक युवतीला आपला जीवनसाथी शोधणे सुकर झाल्याचे म्हटले. याप्रसंगी मोर्शी तालुक्यातील अंबाडा, हिवरखेड परिसरातील अनेक समाज बांधवांची उपस्थिती होती. सर्व शाखीय माळी समाज ऋणानुबंध चे आधारवड केशवराव कांडलकर यांचे अभिष्टचिंतन करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्यात. दिनेश उमप यांनी सूत्रसंचालन केले तर सुरेशराव केंडे यांनी आभार प्रदर्शन केले.

# 'आमचे गाव आमच्या शाळा' मोहिमेअंतर्गत एकवटले चांदूरवासी

### चांदूर रेल्वे तालुक्यातील शासकीय शाळेंतील विविध समस्यांचा वाचला पाढा

### तालुका शाळा बचाव समितीने एसडीओंना दिले निवेदन

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे,( दि.1 )–** 'आमचे गाव आमच्या शाळा' या मोहिमेअंतर्गत चांदूर रेल्वे तालुकावासी ऐकवटले असुन स्थानिक एसडीओंसमोर चांदूर रेल्वे तालुक्यातील शासकीय शाळेंतील विविध समस्यांचा पाढा वाचला व याबाबते निवेदन सोमवारी (ता. 30) दिले.

चांदूर रेल्वे शहर आणि तालुक्यातील सर्व प्रकारच्या शाळांची स्थिती अत्यंत वाईट झालेली आहे. त्यातल्या त्यात जिल्हा परिषद, नगर परिषदच्या मराठी माध्यमाच्या अनेक शाळा जणू शेवटच्या घटका मोजायला लागल्याचे सर्वविदीत सत्य सर्वांनाच स्पष्ट दिसत आहे. एकेकाळी गजबजलेल्या मराठी




शाळा विद्यार्थी संख्येच्या अभावाने विपन्न स्थिती भोगत आहेत. तालुक्यतील शासकीय अनेक शाळांच्या इमारती, त्यातील दारे, खिडक्या मोडकळीस आल्या आहेत, अनेक शाळांना सुसज्ज क्रीडांगण उपलब्धत नाही व असेल तर दुरावस्थेत आहेत व क्रीडासाहित्याचा अभाव आहे, शिक्षक, विद्यार्थ्यांसांठी योग्य स्वच्छतागृहांचा अभाव आहे, अनेक शाळांना योग्य विज्ञान प्रयोगशाळा नाहीत, शाळांमध्ये सफाई कर्मचारी, शिपाई, चौकीदार नाहीत त्यामुळे शालेय स्वच्छतेचा मोठा अभाव आहे, बऱ्याच ठिकाणी संगणक कक्ष आहेत पण ते शिकविण्यासाठी शिक्षकांचा अभाव आहे, शाळांत ग्रथालयांची व स्वतंत्र वाचन कक्षाची व्यवस्था नाही, विद्यार्थ्यांना बसण्यासाठी अनेक शाळेंत बेंचची व्यवस्था नसुन ज्या शाळेत डेक्स, बेंच आहे त्याची अवस्था फारच वाईट आहेत, काही ठिकाणी विद्यार्थ्यांना खाली सतरंज्या टाकून बसविल्या जाते, बऱ्याच ठिकाणी वर्गात पंख्याचा अभाव आहे, अनेक शाळांत स्वच्छ आणि आरोग्यदायी पिण्याच्या पाण्याचा अभाव आहे यांसह विविध समस्या निवेदनात नमुद करण्यात आल्या आहे. सदरचे निवेदन एसडीओंमार्फत मुख्यमंत्री, शिक्षणमंत्री, राज्य सचिव यांना पाठविण्यात आले असुन स्थानिक गटशिक्षणाधिकारी व मुख्याधिकारी यांना सुध्दा देण्यात आले.

निवेदन देतेवेळी चांदूर रेल्वे तालुका शाळा बचाव समितीचे अध्यक्ष नितीन गवळी, उपाध्यक्ष हर्षल वाघ, प्राविण्य देशमुख, सदस्य पांडुरंग डोंगरे, सतीश चौधरी, विनोद जोशी, गजानन पेठे, गजानन यादव, श्रीधर जरे, राजेश पांडे, कमलचंद गुगलीया, ललित सवाने, प्रा. प्रसेनजित तेलंग, अजिंक्य पाटणे, मेहमूद हुसैन, बंडू यादव, राजेश भैसे, पप्पू भालेराव, विनोद लहाने, डॉ. प्रशांत कोठेकर, अथर्व श्रीखंडे, सचिन चुटके, साहिल कोल्हे, रणजीत तायवाडे, रवींद्र साबळे, भुषण नाचवणकर, अंकुश पटले, शशिकांत गाडेकर, विद्याधर वडतकर, रूपेश पुडके, शेख हसन, शितल बेराड, हर्षद गुगलिया यांसह अनेकांची उपस्थिती होती.



# युवकाला विजेचा धक्का लागून मृत्यू

**अमरावती –** तळेगाव दशासर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नांदुरा फार्म परिसरातील सुरेश ओंकार यांच्या शेतातील विद्युत पोलवर काम करण्यासाठी गेलेल्या तरुणाचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाला. ही घटना 29 सप्टेंबर रोजी रात्री 11 वाजता घडली. गोविंद उर्फ संजय रमेशराव हाडके (45, सुलतानपूर, नांदगाव खंडेश्वर) असे मृताचे नाव आहे. महावितरणच्या राजुरा केंद्रातील कृणाल गजानन श्रीनाथ यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# मद्यधुंद तरुणाचा चालकावर चाकूने हल्ला

**अमरावती –** मद्यधुंद तरुणाला वाहन चालवण्यास मज्जाव केला असता, या तरुणाने चालक मनीष तुपटकर यांच्यावर चाकूने हल्ला केला. सदर घटना लोणी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बेलोरा स्टॉपवर घडली. पोलिसांनी आरोपी अश्विन मोहोड, अखिल पंड्या यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

## जाहीर सुचना

सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मौजा अंबापूर, ता. चांदूर रेल्वे जि. अमरावती येथील गट क्र. ३१ मधील ४ हेक्टर ०० आर., आकारू रू. ७.०० पैसे, भो.वर्ग १ चे शेत हे मधुकर अंबासा पोफळे, रा. नागपूर ता. जि. नागपूर यांच्या मालकीचे असून ह्या शेताचा झालेला आहे. ह्या शेताची खरेदी सदरची जाहीरात प्रसिद्ध झाल्यानंतर १५ दिवसांनी करण्याचे ठरलेली आहे. तरी हे शेत कोणीही खरेदी हक्काने, गहाणखत किंवा कोणत्याही लेखाद्वारे लिहून घेतले असल्यास अथवा या शेतावर कोणाचेही कर्ज, हितसंबंध, बोझा असल्यास त्यांनी ही जाहीर सुचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाच्या आत सर्व पराव्यानिशी प्रत्यक्ष खाली दिलेल्या पत्यावर येवून भेटावे. यानंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीचा विचार केल्या जाणार नाही व कोणताही उजर ऐकल्या जाणार नाही, करीता ही जाहीर सुचना प्रसिद्ध करीता आहोत.

शिक्का

आपले विनीत
अॅड. शिवाजी एन. वाघ
रा. जिजामाता कॉलनी, विरूळ रोड, चांदूर रेल्वे
ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती,
मो. नं. ९६०४९११३७९